स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

महाराष्ट्रातील मनरेगा योजने अंतर्गत अहमदनगर आणि अमरावती जिल्हायातील महिलांचा वाढता सहभाग : एक चिकीत्सक अभ्यास (इ.स.२००६-२०१६)

सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत अर्थशास्त्र विषयात पीएच.डी.पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठास सादर करावयाचा

शोध प्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

संशोधक

गायकवाड गंगागौरी लक्ष्मणराव

एम.ए,एम.फील(अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ.सोनाजी.एस.पतंगे

सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

बहिर्जी स्मारक महाविद्यालय बसमतनगर,जि.हिंगोली.

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे विद्या संकूल, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.

मार्च २०१६

महाराष्ट्रातील मनरेगा योजने अंतर्गत अहमदनगर आणि अमरावती जिल्हायातील महिलांचा वाढता सहभाग : एक चिकीत्सक अभ्यास (इ.स.२००६-२०१६)

प्रस्तावना

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देश समृध्द व्हावा यासाठी विविध योजनांची, विकास कामाची देशात अंमलबजावनी सुरू झाली.पण स्वातंत्र्याचा ६० वर्षाचा कालावधी झाला तरी सुध्दा भारताच्या ग्रामीण भागाचा योग्य तो विकास झाला नाही व गाव समृध्द झाले नाहीत. स्वातंत्र्यानंतर शहरी करणाचे प्रमाण झपाटयाने होऊ लागले. ग्रामीण भागाचा विकास अत्यंत मंद गतीने होऊ लागला. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ७०टक्के लोकसंख्या जवळपास शेतीवर व मजुरीवर अवलंबून आहे. त्यासाठी ग्रामीण भागाचा विकास होणे, शेतकरी व मजुरांची आर्थिक समृध्दी झाली तरच गावे समृध्दी होतील व त्यातुनच देश समृध्द होईल. या उद्देशाने महात्मा गांधीचे ग्राम स्वराज्याचे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे सामाजिक न्याय व समतेचे स्वप्न साकार होणे गरजेचे आहे. सन. १९७२ च्या तीव्र दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेल्या रोजगार योजनेने राज्यात इतिहास घडविला आहे. यातून प्रेरित होऊन केंद्र शासनाने सन.२००६ पासून राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना लागू केली आहे.

या सर्व बाबीसाठी देशपातळीवर एक सर्वकष योजना राबविणे गरजेचे होते. त्यासाठी ग्रामीण भागाचे सुयोग्य विकासाची धोरणे आखून उपलब्ध मानवी संपत्तीद्वारे ग्रामीण भागात टिकाऊ सामुहिक मालमत्ता निर्माण करीत असतानाच ग्रामीण भागात राहणाऱ्या व अंग मेहनतीची अकुशल कामे करणाऱ्या मजूरांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने दि.२३ ऑगस्ट२००५ रोजी लोकसभेत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी विधेयक पारित

केले.त्यास राष्ट्रपतीनी ५ सप्टेबर २००५ रोजी मान्यता दिली. त्याचबरोबर संपुर्ण भारतात या विधेयकाची अंमलबजावणी तात्काळ करण्याच्या सर्व राज्यांना सूचना देण्यात आल्या.

MGNREGA (मनरेगा) योजना गंरीबीकडे लक्ष्य केंद्रित करून गांधी तत्वावर आधारित आहे. इतर ग्रामीण रोजगार योजनेच्या अनुभवाच्या तुलनेत नरेगा योजना हि ५६ वर्षापासून सुरू आहे.यामध्ये दोन्ही केंद्रीत प्रायोजीत योजना आणि राज्यसरकार यांचा समावेश केलेला आहे.या कार्यक्रमामध्ये विविध योजनांचा समावेश आहे. त्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार (**NREP**) १९८०-८९, ग्रामीण भूमिहिन रोजगार हमी कार्यक्रम (**RLEGP**) १९८३-८९, जवाहर रोजगार योजना (**JRY**) १९८९-९०, रोजगार हमी योजना (**EAS**) १९९३-९९, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना(**SGRY**)२००१,राष्ट्रीय अन्न सुरक्षा कार्यक्रम (**NFFWP**)२००४पासून अंमलात आणली आहेत. यातील **SGRY** आणि **NFFWP** या दोन्ही योजना नरेगामध्ये विलिन केल्या आहेत.

२ फेब्रुवारी२००६रोजी ग्रामीण भागात रोजगार निर्मिती, पायाभूत सुविधा, विकास व अन्नसुरक्षा याना एकत्रित करून सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (MGNREGA)योजना अंमलात आणली. **MGNREGA** योजना आकराव्या पंचवार्षिक योजनेत (२००७-१२) मध्ये मांडण्यात आलेली आहे.

ग्रामीण भागातील गरिबी, बेकारी याच्यावर मात करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा अर्थातच **MGNREGA** योजना अमंलात आणली. या योजनेला अतिशय चागंला प्रतिसाद मिळाला. या योजनेला चांदीची BULLET म्हणून लोकांनी/कामगारांनी गौरविले आहे. गेल्या काही शतकामध्ये भारतातील बेकारी, ग्रामीण भागातील गरीबी ही अभूतपूर्व पातळी होती. बेकारी, निरक्षरता, अंधश्रध्दा, भूक, लोकांच्या वाढत्या गरजा, मुलांचे वाढते प्रमाण,अशक्त गर्भवती महिला, भुकबळी मृत्यु, अपूरा

रोजगार, दुष्काळामध्ये उत्पादनाचे घटता क्रम या समस्यावर उपाय करण्यासाठी(भारत सरकारने) ग्रामीण बेरोजगाराना, गरिबांच्या उदरनिर्वाहासाठी एक उपाय म्हणुन राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (नरेगा) कायदा केला आहे. सुरूवातीला नरेगा योजनेचा खर्च जो दरवर्षी जागतिक कार्यक्रम ११.३०० कोटी २००६-०७ मध्ये होता.२०१०- ११मध्ये तो खर्च ४०,००० कोटीवर गेला. हा कायदा अतिशय कोटेकोरपणे पाळला जातो.१००दिवसांच्या रोजगारामध्ये ग्रामीण भागातील कोणत्याही घरातील प्रौढ सदस्य हे सार्वजनिक कामे तसेच रोजदारीवर अकुशल बेरोजगाराना कामासंबंधीत माहिती देऊन राबावली जाते. राज्या-राज्यामध्ये वेतन हे बदलत्या स्वरूपाचे आहे.काही ठिकाणी ८०रू तर काही ठिकाणी १२५रू आहे. किमान १२०रू वेतन असणे आवश्यक आहे.

कायदयाने पुढील अनिवार्य जिल्हा दृष्टीकोन योजना आणि वार्षिक योजनाच्या माध्यमातून नियोजन केले होते. त्याचप्रमाणे नमुना नोंदणी प्रक्रिया अस्तित्वात करण्यात आली आणि ग्रामपंचायतीकडे अर्ज व जॉबकार्ड याचा समावेश केला आहे. कामाविषयक अर्ज केल्यापासुन १५ दिवसात रोजगार उपलब्ध करून दिले जाते. दरवर्षी घरातील व्यक्ती प्रति १०० दिवस काम मिळवण्याचा समान हक्क विविध प्रौढ सदस्यांना समान दिले जाते. वनीकरण, दुष्काळ अवरोधन, सिंचन कामे, पारंपारिक जलाशयाचे संधारण, जमीन विकास,पूरनियंत्रण, ग्रामीण जोडणी आणि पाणी साठवण इ. कामे घेण्यात आली आहेत. कायदयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना—महाराष्ट्र या योजनेतंर्गत घेण्यात येणाऱ्या मजुरी व साहित्यांचे प्रमाण ६०:४० निश्चित करण्यात आले. म्हणजेच,अकुशल मजुरीवरील खर्च कामाच्या एकुण ६०टक्के पेक्षा कमी असु नये, तर साधन सामग्रीवरील खर्चाचे प्रमाण ४० टक्यांच्या मर्यादेत राखणे आवश्यक आहे.

२फेब्रुवारी २००६ पासून मनरेगा योजना २०० जिल्हयामध्ये प्रारंभ झालेली आहे. मनरेगा १एप्रिल२००६ पासून भारतात सर्व जिल्हामध्ये प्रारंभ झालेली आहे. २००९-१२ पासुन अनुसूचित जाती/जमातीसाठी कायदयाने सामाजिक न्याय सुनिश्चित दुर्बल वर्गासाठी ३०टक्के अधिकार देण्यात आलेले आहे. ३१,८४८ ग्रामीण भागात मनरेगा योजना प्रारंभ झालेली आहे. २ ऑक्टोबर २००९ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा असे नामकरण झाले.

मनरेगा योजनेच्या अभ्यासाची आवश्यकता

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्रातील शासनाच्या इतर विकासात्मक योजनांपेक्षा वेगळी आहे. इतर योजनेंच्या तुलनेत या योजनेमध्ये कायदयाने प्रदान झालेले मजूरांच्या अधिकारामुळे योजनेला वेगळेच महत्व प्राप्त झालेले आहे. अकुशल(अंगमेहनतीचे) काम करण्यास इच्छुक असणारे १८वर्षावरील ग्रामीण भागात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला काम मागण्याचा अधिकार कायद्याने दिलेली आहे. व मागणी केल्याप्रमाणे काम उपलब्ध करून देणे कायद्याने बंधनकारक केले आहे. यामध्ये स्त्री-पुरूष असा कोणताही भेद नाही. म्हणुन महाराष्ट्रातील मनरेगा योजने अंतर्गत वाढता महिलांचा सहभाग : एक चिकीत्सक अभ्यास अभ्यासाची आवश्यकता आहे.

मनरेगा आणि रोजगार

कायदयाने १८वर्षावरील व्यक्तीला कामाची मागणी केल्यास काम देणे अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेस बंधनकारक केल्याने काम मिळविण्याचा अधिकार योजनेमुळे प्राप्त झाला आहे. कायदयात एका कुटूंबाला १०० दिवस काम उपलब्ध करून देण्याची तरतूद असल्यामुळे कुटूंबाला १००दिवस काम मिळण्याची हमी आहे. केलेल्या कामाची मोजमापा प्रमाणे मजुरी प्रदान केली जात असल्यामुळे केलेल्या कामाप्रमाणे

मोबदला प्राप्त होतो. कामाची मागणी केल्यावर १५ दिवसाचा आत काम उपलब्ध झाले नाही तर मजुराला मजुरी दराच्या २५ टक्के बेरोजगारी भत्ता अनुज्ञेय आहे.

मनरेगा आणि महिला सबलीकरण

मनरेगा योजने अतंर्गत महिला व पुरूषामध्ये भेदभाव न ठेवता समान मजुरीचे दर ठेवण्यात आले आहेत.योजनेमध्ये महिलांचा मोठया प्रमाणात सहभाग असणे (किमान ३३टक्के) गरजेचे आहे. योजने अंतर्गत राज्यामध्ये निर्माण झालेल्या एकुण मनुष्यदिवस निर्मितीमध्ये सन.२००९-१० या वर्षात ४९ टक्के सहभाग महिलांचा होता. तर २०१२-१३ या वर्षात महिलांचा सहभाग ४५टक्के इतका होता.

मनरेगा आणि ग्रामीण विकास

विकेंद्रिकरणानुसार, स्वत:च्या गावाचे विकासात्मक कामाचे नियोजन करण्याचा अधिकार ग्रामसभेला प्राप्त झालेले आहे. जलसंधारण व जलसंवर्धन कामे, दुष्काळ प्रतिबंधक कामे(वनीकरण व वृक्ष लागवडसह),जलसिंचन, कालव्याची कामे, भुविकासाची कामे, पुरनियंत्रण, पुरसंरक्षणाची कामे, ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे मनरेगा योजने अंतर्गत ग्रामीण भागाचे विकास झालेले आहे.

महाराष्ट्रातील मनरेगा योजने अंतर्गत अहमदनगर आणि अमरावती जिल्हायातील महिलांचा वाढता सहभाग : एक चिकीत्सक अभ्यास (इ.स.२००६-२०१६)

हा विषय निवडण्यात आलेला आहे. आतापर्यंत या विषया संदर्भात तुलनात्मक संशोधन झालेले नाही हे महत्वाचे आहे. या योजनेतून झालेला फायदा, रोजगाराची निर्मिती, महिलांना रोजगार उपलब्ध तसेच आर्थिक स्थितीची पाहणी करून त्यांच्या समस्यांचा शोध घेऊन आणि त्यावर उपाययोजना व उपयुक्त शिफारशी करण्याच्या हेतुने प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

२. संशोधनाची उदिष्टये :—

१ मनरेगा योजने अंतर्गत महिला लाभार्थ्याचा अभ्यास करणे.

२ मनरेगा योजनेतून मिळणाऱ्या रोजगाराचा अभ्यास करणे.

३ मनरेगा योजने अंतर्गत महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

४ मनरेगा योजने अंतर्गत महिला कामगाराच्या जागरूकते विषयीचा अभ्यास करणे.

५ मनरेगा योजनेविषयी येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करणे.

३. संशोधनाची गृहितके

१ मनरेगा योजनेविषयी महिला लाभार्थ्यांमध्ये जागरूकता आहे.

२ मनरेगा योजना ग्रामीण विकासाचा दृष्टिने फायदेशीर ठरली आहे.

३ मनरेगा योजना महिला सबलीकरणात यशस्वी ठरली आहे.

४. संशोधन पद्धती

संशोधन हा शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करूण वृध्दीनिष्ठ अणि व्यावहारिक अशा प्रश्नाची उतरे शोधून काढण्याचा एक प्रयत्न आहे. जिज्ञासा व ज्ञान साधना हे मानवाचे असामान्य गुण आहेत. त्या आधारावरच माणसाला ज्ञान प्राप्ती झाली पण त्याची खरी प्रगती होण्याची कारणे म्हणजे विचाराकडे किवा घटनेकडे त्याची पाहण्याची चिकित्सक दृष्टी होय. ही दृष्टी असणे संशोधनाची पहिली पायरी आहे.

वेबस्टरच्या कोशात “संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्वे अथवा तत्वे परिक्षणासाठी केलेला चिकित्सक व पध्दतीशीर अभ्यास होय” अशी व्याख्या करण्यात आली. महाराष्ट्रातील मनरेगा योजने अंतर्गत अहमदनगर आणि अमरावती जिल्हायातील महिलांचा वाढता सहभाग : एक चिकीत्सक अभ्यास (इ.स.२००६-२०१६) संशोधनाची उदिष्टये, संशोधनातील ग्रहीतके, अध्ययन क्षेत्र, माहिती संकलन, प्रस्तुतीकरण, विश्लेषण हे कशाप्रकारे केले आहे याचे सविस्तर विश्लेषण पुढील प्रमाणे करणार आहे.

अ प्राथमिक माहितीचे स्त्रोत

संशोधन क्षेत्रात आणि निवडलेल्या प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीमध्ये मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात येणार आहे. कारण ही पद्धत प्राथमिक तथ्य संकलन करण्यासाठी सर्वसमावेशक असून या पद्धतीव्दारे शास्त्रशुद्ध व मौलिक तथ्य संकलन करता येऊ शकते. ही मुलाखत अनुसूची संशोधन उद्दीष्टांना, संशोधन प्रश्नांना अनुसरून जास्तीत जास्त बंदिस्त तर काही अंशी खुली अशा मिश्र स्वरूपाची तयार केली गेली आहे.

ब दुय्यम माहितीचे स्त्रोत

संशोधकाने संशोधकाच्या दृष्टीकोनातून महत्वपूर्ण माहिती प्राप्त दुय्यम सामुग्रीचा वापर केला आहे. ज्यात शोधप्रबंधावरील मासिक तसेच साप्ताहीक, मासिक, पाक्षिक, त्रैमासिक आणि वार्षिक अंकात प्रकाशित झालेले लेख इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे. इकॉनॉमिक ॲन्ड पॉलिटीकल विकली, प्रकाशित झालेल्या माहितीचा वापर करण्यात येणार आहे.

क. तथ्य संकलन आणि विश्लेषण

प्रस्तूत संशोधनात संशोधकांने संशोधन करण्यासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात येणार आहे.

प्रस्तुत विषय अभ्यासण्यासाठी महाराष्ट्रातील नरेगा योजन अंतर्गत महिलांचा जास्तीत जास्त सहभाग असलेल्या अहमदनगर जिल्ह्याची व अमरावती जिल्ह्याची निवड केलेली आहे. अहमदनगर जिल्ह्यात १६ तालुके व अमरावती जिल्ह्यात १४तालुके आहेत. त्यापैकी संशोधकांने ५० टक्के प्रमाण घेऊन अहमदनगर जिल्ह्यातील १६तालुक्यापैकी ७ तालुक्याची आणि अमरावती जिल्ह्यातील १४तालुक्यापैकी ७ तालुक्याची निवड अभ्यासासाठी करणार

आहे. त्यासाठी यादृच्छिक नमुना निवडीतील सहेतूक पद्धतीचा अवलंब करून १४तालूक्याची निवड अभ्यासासाठी केलेली आहे.

संशोधन क्षेत्रातील निवड केलेल्या तालूक्यातील गावापैकी प्रत्येक तालूक्यातून ५टक्के प्रमाण घेऊन प्रत्येक तालूक्यातून ७ गावे प्रथम सहेतूक नमूना निवड पध्दतीने निवडून एकूण ९८ गावाची निवड केलेली आहे. संशोधकाने सहेतूक नमूना निवड पध्दतीने निवडलेल्या ९८ गावातील प्रत्येकी १० महिला लाभार्थी याप्रमाणे ९८ गावातील एकूण ९८० महिला लाभार्थी निवडण्यात आलेले आहेत. तसेच प्रत्येक गावातील ग्रामरोजगार सेवक आणि सरपंच यांना मुलाखतीसाठी विचारात घेतलेले आहेत.

५. संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा)२००६ पासून अंमलात आलेली आहे. या योजनेचा महिलाच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी २००६-२०१६ कालावधी घेण्यात आलेला आहे.

६. **प्रकरणाची रूपरेषा**

प्रकरण पहिले

प्रस्तावना

प्रकरण दुसरे

संशोधन साहीत्याचा आढावा व संशोधन पध्दती

प्रकरण तिसरे

अहमदनगर व अमरावती जिल्ह्यातील मनरेगा योजना

प्रकरण चौथे

मनरेगा योजने अंतर्गत विकास कामाची प्रवत्ती

प्रकरण पाचवे

मनरेगा कार्यक्रमा अंतर्गत महिला लाभार्थ्यांचा अभ्यास

प्रकरण सहावे

गृहितक सप्रमाणता व निष्कर्ष आणि शिफारशी

संशोधक

कु.गंगागौरी लक्ष्मनराव गायकवाड

समाजिकशास्त्रे संकुल,

स्वा. रा. ती. म. विद्यापीठ,नांदेड

मार्गदर्शक

डॉ. एस.एस.पतंगे

सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

हु.बी.एस.महाविद्यालय बसमतनगर, जि.हिंगोली

संदर्भ

१. नरेगा योजना—महाराष्ट्र ग्रामरोजगार सेवक माहिती पुस्तीका

२. नरेगा योजना—महाराष्ट्र ग्रामरोजगार सेवक माहिती पुस्तीका

३. नरेगा योजना महाराष्ट्र व राज्य रोजगार योजना वार्षिक आहवाल सन २००९—१० ते २०१२—१३

४. www.nrega.nic.in

५. Ministry of Rural Development 2005,

६. Ministry of Rural Development 2005,

७. www.epw.in/review-rural-affairs/agricultural-and-livelihood-vulnerability-reduction-through-mgnrega.html